‘आई व प्रेरणाताई’

ती. घरात एक आई व शाळेत मुलांची बाई. नव्हे प्रेरणाताई. ‘मोन्या’ म्हणजे कर्णबधीर मुलांच्या शाळेतली शिक्षिका. आठ मुलांचा वर्ग. ‘कानाने बहिरी, मुकी परी नाही’ अशी ती चिमणी बाळं. हिला ‘अगं’ ‘तुगं’ च करणार. अशीच हिची शिकवण. ही त्यांना न कंटाळता नीट समजेतो पुन्हा पुन्हा शिकवत राहणार. रात्र रात्र जागून मेहनतीनं त्यांच्याकरिता चार्ट बनव, व्हिडियो व गणकयंत्रांचा सुयोग्य वापर करून पाठ बनव असे तिचे उपक्रम. मनापासूनचे. शिकवताना मनात कायम मुलांचाच विचार. मुलांना शिकवताना स्वतःपण शिकायची तयारी. चुका झाल्या तर त्याही कबूल करून मुलांबरोबर वाटून घेऊन पुढं जाणारी. त्यांना काही बाही लिहायला, वाचायला देऊन आपण आपली वैयक्तिक कामं करत वा शब्दकोडी सोडवत बसण्याचा विचारही हिच्या मनाला कधीच शिवणार नाही. पण कुणी सहकारी असं काही करत असेल तर नाराजी व्यक्त करायला पण मागंपुढं बघणार नाही. त्यामुळेच वरिष्ठ व सहकारी वचकून तर वर्गातली मुलं व त्यांचे पालक जाम खुष. शाळेची व अभ्यासाची आतुरतेने वाट पाहणारी मुलं. अगदी सुटीच्या दिवशी बोलावलं तरी आनंदानं घेऊन येणारी. मुलांना दटावणं, रागावणं, चापट मारणं असली साधनं हिला लागत नाहीत. हिचा धाक, राग, संताप व प्रेम फक्त डोळयांतूनच प्रकट होणार. घरी ही एका मुलीची व एका मुलाची आई. जागरूक. पुस्तकी शिक्षणापेक्षा जीवनात उपयोगी पडेल असल्या शिक्षणाला प्राधान्य देणारी. ज्ञानोपासक व्हायला व

कुठच्याही अन्यायाविरूद्ध पेटून उभं रहायला प्रत्यक्ष कृतीतून शिकवणारी. कागदाला घडी घालायला वेळ लागला म्हणून पहिलीतल्या मुलाला टीचरनं हाताच्या कोपरावर पटटी मारली. तो भाग काळानिळा झाला. मुलगा बोलला नाही पण हिचं लक्ष गेलं. पुढं दोन दिवस सुटी होती. माराचे वळ पुसट होतील म्हणून ही लगोलग मुलाला घेऊन फादरपुढं हजर. ते पण ही असली क्रूरता पाहून अवाक. सोमवारी शिक्षिकेची खरड. माफी. 'एकेक शब्द, वाक्य, स्पेलिंग, धडा वा निबंध पन्नास-शंभर वेळा लिहून काढा' असलं अघोरी होमवर्क ती कधीच देणार नाही. करू देणार नाही. मग स्वतःच्या मुलांसाठी शाळेत जाऊन हुज्जत घालावी लागली तरी बेहत्तर. 'माझी आई' हया विषयावर दुसरीतल्या मुलीनं निबंध लिहीला. तो तपासताना काही वाक्यांवर तिच्या शिक्षिकेनं लाल शाईनं काट मारली व सुधारित निबंध दहा वेळा लिहून आणायची शिक्षा केली. 'माझी आई प्रेम करते तेव्हा मला खूप खूप आवडते. पण माझं काहीही चुकलं नसतानाही रागावली की मला तिचा खूप खूप राग येतो'. ही ती वाक्यं. लाल शाईची काट बघून हिच्या मस्तकात तिडीक. शाळेत जाऊन शिक्षिकेशी वाद. माझ्या मुलीनं तिच्या ख-या भावना लिहील्या आहेत असं हिचं म्हणणं तर मुलांनी आपल्या आईवडिलांविषयी नेहमी चांगलंच लिहीलं पाहिजे असं शिक्षिकेचं म्हणणं. अन असला सुधारित निबंध दहा वेळा तर माझी मुलगी मुळीच लिहीणार नाही. मग अखेर फादरची मध्यस्थी व शिक्षिकेची माघार. पण वर मल्लिनाथी,'अश्यानं तुमची मुलं बोर्डात पास

सुद्धा व्हायची नाहीत'. ठीक आहे. होऊ देत नापास व्हायची असली तर. हिला अजिबात फिकीर नाही. रात्री झोपताना रोज नवीन गोष्ट सांगायचं काम बाबांचं. ते कधी बाहेर गावी वा परदेशी गेले तर आई कडं. नाहीतर बाबांच्या टेप केलेल्या गोष्टी ऐकत मुलं झोपी जायची. हिच्या गोष्टी ख-या खु-या. थोरामोठयांच्या चरित्रातल्या. बोधप्रद. साहजिकच कंटाळवाण्या. बाबांच्या मात्र भन्नाट रचून सांगितलेल्या. धम्माल गमती जमतीच्या. परी-राक्षसांच्या. भुताखेतांच्या. साहजिकच जास्त मजेशीर व आवडीच्या.

मुलगी तिसरीत शिकत असताना नीती शास्त्राच्या (मॉरल सायन्स) तासाला 'देव आकाशातल्या स्वर्गात तर दानव पाताळातल्या नरकात राहतात अश्या आशयाचा धडा झाला'. तर पुढच्याच सायन्सच्या तासाला दुर्बिणीवरच्या (टेलिस्कोप) पाठात 'आकाशातल्या मोठ्ठाल्या वस्तू पहायला दुर्बिण वापरतात असं शिकवलं'. मग अशा दुर्बिणीतून स्वर्ग दिसेल काय व 'देव' पाहता येईल काय असा शिक्षिकेला निरूत्तर करणारा पण भाबडा प्रश्ण. मुलीनं भर वर्गात विचारलेला. घरी आईला पण. तो इंग्रजीतला धडा एका विख्यात मराठी शास्त्रज्ञानं लिहिलेला होता. हिनं लेकीला पोस्टकार्ड आणून दिलं व त्यांनाच हा प्रश्ण लिहून पाठवायला सांगितलं. त्या थोर वैज्ञानिकाची मुलांच्या प्रश्णांना आवर्जून उत्तरं द्यायची ख्याती होती. आठ दिवसात त्यांचं उत्तराचं कार्ड. 'स्वर्गाची व देवाची कल्पना आपल्या मनाची असून देव आपल्या मनात असतो. म्हणून तो दुर्बिणीतून पाहता येणार नाही'

अश्या आशयाचं. हिनं मनापासून दाद दिली. मग आपल्या मुलांबरोबरच शाळेतल्या मुलांना पण वरळीच्या तारांगणात घेऊन गेली. त्यांना समजेल अशा शब्दांत त्यांच्याकरता पाठ तयार केले. मुलं शाळेत असतानाच खग्रास सूर्यग्रहणाचा योग आला. कुटुंबाची मग सहलच निघाली. ऐन थंडीच्या दिवसात फत्तेपूर सिक्रीपासच्या छोटया टेकडीवरून सकाळी साडेआठ वाजता दिसणारा अडीच मिनिटांचा तो अपूर्व सोहोळा डोळे भरून बघितला. शाळेतल्या मुलांसाठी पुष्कळ छायाचित्रं घेऊनच परतली. मुलाला आग्रहानं हा अनुभव लिहायला सांगितला व 'अमर चित्रकथा'च्या पै अंकलकडं पाठवून दिला. त्यांनी पण तो आवर्जून 'टिंकल'च्या पहिल्या पानावर छापला. आपलं लिखाण व नाव बघून मुलगा हरखून गेला.

मुलं मोठी होत होती. घरातली व वर्गातली पण. सहज बोलण्यात, भांडतांना अव्वल शिव्या तोंडात येऊ लागल्या होत्या. वर्गात अस्सल मराठीतल्या व घरात 'फ' काराच्या. मग हिनं एक प्रयोग केला. स्वतःच्या मुलांपासून. त्या अपशब्दांचा अर्थ त्यांना समजेल अश्या सोप्या शब्दांत समजावून सांगितला. आपल्या आईला वा बहिणीला असं बोललेलं चालेल का तुम्हाला? हा सवाल. राग व संताप व्यक्त करण्यासाठी शिव्या देण्याशिवाय आणखी काय काय करता येईल हयावर पण चर्चा झाली. काही महिने जावे लागले. मुलांना पण सुरूवातीला जडच गेलं. पण मुलांची बोली तरा सुधारलीच पण हाच प्रयोग ती आपल्या सवंगडयांवर पण करू लागली.

यथावकाश दोन्ही मुलं दहावीच्या भोज्यापाशी येऊन पोहोचली. प्रत्येक सुटीत ती मुलांना काहीतरी छंदात किंवा कामात गुंतवून ठेवायची. मग कधी जर्मन भाषेची ओळख तर कधी स्काऊटचे कँप. प्रस्तरारोहण, पोहोणं वा गिरीभ्रमण. पावसाळयात तर फारशी गर्दी नसेल व दारूकाम नसेल अश्या ठिकाणच्या धबधब्यांखाली बाबांनाही घेऊन जायचा कार्यक्रम तर दर वर्षी चा ठरलेला. मुलाचा कल इंजिनियरिंग कडे जायचा तर मुलीनं सोशल वर्क मध्येच करियर करायचा निर्णय सातवीत असतानाच घेतलेला. इतर मुलांच्या बरोबरीनं दहावीला कोचिंग क्लासला नावं नोंदवली खरी पण हिची मुलं तिथल्या घोकंपटटीत रमली मात्र नाहीत. परीक्षकांना कसं हवंय यापेक्षा आपल्याला कसं मांडावंसं वाटतंय हयातच ती अधिक रमत. परिणामी मुलं पहिल्या वर्गाला लागणा-या गुणांपेक्षा थोडयाशाच अधिक गुणांनी पास झाली. त्या गुणांवर मिळालेल्या महाविद्यालयांमध्ये त्यांना प्रवेश घ्यावे लागले. त्याची फिकीर ना तिला ना मुलांना. कारण आता बोर्डाच्या व विद्यापीठाच्या परीक्षा होत्या. कॉलेज कुठलं हे दुय्यम होतं. अभ्यास मुलांनाच करायचा होता. तो कसा करायचा हे त्यांना चांगलंच उमगलेलं होतं. परिणामी तिला व बाबांना मुलांमागे अभ्यासाची भुणभूण कधीच लावावी लागली नाही. कॉलेजमधली सोशल गॅदरिंग्ज, खेळ, स्पर्धा व सहली यात ती मनापासून सहभागी होत. जरा मोठी झाल्यावर देशोदेशीचे चित्रपट, आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, उत्तम नाटकं व भाषणं तसेच प्रदर्शनं हयांना आईबाबांबरोबर किंवा मित्रमैत्रिणींबरोबर हजेरी. नियमितपणे व आवडीने.

तिच्या वर्गातली छोटी मुलं फार निरागस अन तितकीच भोचकपण.ही पण त्यांच्यातलीच होऊन राहणार.जणु त्यांची मैत्रिणीच.हिचं ही त्यांच्यावर फार प्रेम.कुणी आजारी पडलं, बरेच दिवस शाळेत येत नसलं की ही घर शोधत शोधत जाणार.अगदी अचानक.मग ती जागा एखाद्या जुन्या चाळीतली असू दे, की बकाल झोपडपट्टीतली.अत्यंत अपु-या जागांतले पण समाधानानं ओसंडणारे ते संसार पाहून ही भारावून जाणार.वर्गात कधी मधी मग 'तुझं घर केवढं आहे ग? तुझी मुलं केवढी आहेत? त्यांचे बाबा काय करतात'? अशा चौकशा.मग एका रविवारी सगळया मुलांची सहल हिच्या घरी.एवढं मोठ्ठं घर, रम्य परिसर, सागर किनारा व खेळायची साधनं पाहून मुलं अचंबित.हलायलाच तयार नाहीत.हिच्या हातचं जेवण व हिनं स्वतः बनवलेलं आइस्क्रिम खाऊन तृप्त.हिची मुलं व मुलांचे बाबापण सामील.मग एके दिवशी वर्गातल्या मुलीच्या वाढदिवसाचं निमंत्रण.तुझ्या मुलांना घेऊन ये म्हणून आग्रह.हयाच महानगरातली ती वस्ती पाहून हिची मुलं थक्क व काहीशी अंतर्मुख.मग वर्गातल्या प्रत्येक मुला-मुलीच्या वाढदिवशी हिच्या मुलांच्या खाऊच्या साठवलेल्या पैशातून पुस्तकांची भेट.कितीतरी वर्ष.त्यातून उभयतांनी जपलेले स्नेहबंध.अद्यापही कायम.

हिची मुलं आता महाविद्यालयांत जाऊ लागलेली.अभ्यास कितीही असला तरी घरातल्या छोटया मोठया कामात मनापासूनचा सहभाग आवश्यक.फार लहानपणापासून.अगदी परीक्षेच्या दिवशी सुद्धा.जेवताना आवडो न आवडो.पानात सुरूवातीला वाढलेले सगळे अन्नपदार्थ खाल्लेच

पाहिजेत . ही अपेक्षा . शिवाय दररोज सायंकाळी दोन तास घराबाहेर पडलंच पाहिजे . खेळायला नाहीतर फिरायला . नुकताच सॅटेलाईट टी . व्ही . व केबल नेटवर्कचा पसारा वाढलेला . सतराशे साठ वाहिन्या सतत सुरू . मोठीही पार खुळावलेली मग छोटयांची काय कथा? . रिमोट कंट्रोल मुलांच्याच हातात . मुलांनी पाहू नये असेही काही चॅनल्स . पण हिनं कधीच आडकाठी केली नाही . पाहू देत त्यांना काय काय दाखवताहेत ते . त्यांना बरं वाईट कळतं . अन खरोखरीच दोनेक महिन्यात मुलांचा उत्साह कमी झाला . त्यांना आवडतील तेच कार्यक्रम उपलब्ध वेळात पहायची स्वयंशिस्त त्यांनी लावून घेतली . स्वतःहून . पुढं कम्प्यूटर, मोबाईलची खरेदी जरूर भासली तेव्हाच . उगाच खेळ व चैन म्हणून नाही . मुलं वयात येत होती . बरोबरीच्या मित्रमैत्रिणींविषयी वाटणारं प्रेम व आकर्षण, त्यातले ताणतणाच व विचित्र वर्तणुकीचे नानाविध नमुने . मुलं हिच्याशी मोकळेपणानं शेअर करीत . कारण ही आपल्याला समजून घेईल व पूर्ण निर्णय स्वातंत्र्य मिळेल हयाची खात्री .

मुलाला इंजिनियरिंगला जायचं होतं . सुटीत जेटकिंगची किटस आणून छोटी उपकरणं बनवायचा . त्यामुळं गोडी लागली होतीच . पण घोकंपटटीच्या रूळलेल्या वाटेवरून जायचं नसल्यानं बारावीला गुण फार मिळाले नाहीत . नातेवाईकांनी विविध स्पर्धा परीक्षांना बसायचं टुमणं लावलं . पण हिचा व मुलाचा साफ काणाडोळा . कॅपच्या मांडवाखालून पण जायचं नव्हतं . मग इलेक्ट्रॉनिक्सच्या डिप्लोमाला जायचं ठरलं . तिथं दोन वर्षे कसून मेहनत करून तो पहिला आला . शेवटच्या सेमिस्टरला ‘विकतची’ तयार

प्रोजेक्टस आणून 'सबमिट' करण्याची वहिवाट असताना हिच्या आग्रहाखातर हयानं स्वतःच मेहनत घेऊन रिमोटवर चालणारा गाडा (लाइन फॉलोअर) बनवला व सुवर्णपदक मिळवलं.हया मेहनतीचा अनुभव जन्मभर पुरून उरणार होता.पहिला आला असं जाहीर झालं असताना प्रत्यक्ष हातातलं सर्टिफिकेट मात्र दुस-या क्रमांकाचं होतं.मुलानं वरपर्यंत दाद मागायचा त्याच्या परीनं प्रयत्न केला.पण पालकांनासुद्धा हाकलून लावायच्या जमान्यात पाल्यांना विचारतो कोण? उडवाउडवीची उत्तरं मिळाली.मग ही जाऊन धडकली.क्रमवारी लावायची टेक्निकल बोर्डाची लिखित नियमावलीच संस्थाचालकाना काढून दाखवायला लावली.नम्रपणे पण आग्रहाने.मग संस्थाचालकांना चूक कबूल करणं भागच पडलं.पहिला क्रमांक मिळाल्याचं सर्टिफिकेट बदलून द्यावंच लागलं.वर हिनं सुनावलंच, 'मी पण एक शिक्षिका आहे.आपल्या वागण्यामुळं शिकणा-या मुलांच्या मनात हया व्यवस्थेविषयी चीड व संताप होईल असं आपण का वागावं? माझ्या मुलाच्या मनात हया संस्थेविषयी काय मत बनेल? हयाचा आपण कधीतरी विचार करणार आहोत की नाही? तुम्हीच बनवलेले नियम न पाळता आत्तापर्यंत किती मुलांवर अन्याय केला असेल?'.निमूटपणे ऐकून घेण्याशिवाय व्यवस्थापनाला काही मार्गच उरलेला नव्हता.

मुलानं पुढं तीन वर्षांत बी.ई.पण केलं.कम्प्युटर सायन्सेस मध्ये.त्याला एम.एस.करण्याकरिता परदेशी जायचं होतं.त्यासाठी आवश्यक त्या परीक्षा त्यानं शिकवणी न लावता दिल्या.विविध विद्यापीठांच्या प्रवेशअर्जांचे

सर्व सोपस्कार मुलानं स्वतः नेटवर शोध घेऊन पार पाडले. बँकेकडून कर्ज मिळवण्यात हिनं पुढाकार घेतला व मुलगा आवडीचं शिक्षण घ्यायला रवाना झालासुद्धा. लहानपणापासून मिळालेले स्वावलंबनाचे, पडेल ते काम नीट करण्याचे व कुठच्याही अन्याया विरूद्ध दंड थोपटून ठामपणानं उभं राहण्याचे अनुभव व बघितलेले प्रसंग आता उपयोगी पडणार होते.

मुलीनं ठरवल्याप्रमाणं सोशलवर्कमध्ये पदव्युत्तर शिक्षण पुरं केलं. शेवटच्या सेमिस्टरला प्रचलित शिक्षणव्यवस्था व एकूणच परीक्षापद्धतीवरचा तिचा विश्वास उडत चाललेला होता. हे सगळं सोडून देण्याचे विचार पण मनात येऊ लागलेले होते. पण हिनं खुबीनं तिची समजूत काढून उत्तम गुणांनी शिक्षण पुरं करायला लावलं. शिकताना खेडयातल्या जीवनाचा अनुभव घेत होतीच. २००४ च्या त्सुनामीनंतर चेन्नई परिसरात मदत कार्यात पण काम करून आली. देशभरातल्या स्वयंसेवी संस्थांच्या नोंदी ठेवण्याच्या व पाहणीच्या एका प्रकल्पात मुलीला काम मिळालं. एकटीनंच फिरायचं होतं. देशभर. खेडोपाडी. मित्रमैत्रिणी व नातेवाईकांना हे वेडेपणाचं वाटत होतं. पण आईबाबांच्या भक्कम पाठिंब्यावर तिनं ती जबाबदारी उत्तम प्रकारे पार पाडली. अश्याच एका सामाजिक कामाच्या मेळाव्यात तिला तिच्या विचारांशी जुळणारा व आवडीचा असा जोडीदार भेटला. सॉफ्टवेअर इंजिनियर. अमेरिकेत कामाला. नोंदणी पद्धतीनं व अत्यंत साधेपणानं लग्न करून ती पण अमेरिकेत गेली. जाण्यापूर्वी ती दोघं हिच्या वर्गातल्या मुलांना भेटून गेली. हिच्या शाळेतल्या मुलांना पण त्या दोघांची आठवण आहे. जरा

स्थिरावल्यावर, आवश्यक सोपस्कार पूर्ण करून मुलगी आता अमेरिकेतल्या एका नामवंत विद्यापीठात सोशल वर्कमध्ये डॉक्टरेट करत आहे.

अलिकडेच दोन्ही मुलांच्या आग्रहाखातर ही मुलांना भेटायला जाऊन आली.ते सुद्धा मे महिन्यामध्ये.शाळेला उन्हाळयाची सुटी पडल्यावर मगच.कितीतरी प्रेक्षणीय स्थळं पहात असताना हिला शाळेतल्या मुलांची आठवण येई.त्यांच्यासाठी काय काय नेता येईल.कुठचे नवे पाठ बसवता येतील हयाचाच विचार सतत डोक्यात.कितीतरी माहितीपुस्तके, व्हिडियो फिल्मस, खेळणी व खाऊ घेऊनच परतली.पोटच्या मुलांनी फारच आग्रह केल्यानं नव्या वर्षात शाळा सुरू झाल्यावरती तीन आठवडयानं ही परतली.तोवरच्या बदली शिक्षिकेला हिची मुलं कंटाळलेली.चातकासारखी हिची वाट पहात बसलेली.हिच्या मनात पण शाळेविना चुकल्या चुकल्यासारखी भावना.वर्गाच्या दारात ही दिसताच मुलांचा गराडा.प्रत्येकाशी गळामिठी.'कुठे गेली होतीस ग आम्हाला सोडून?आम्ही किती वाट पहात होतो तुझी'.त्यांच्या त्या चिमुकल्या व निरागस चेहे-यांवरचा आनंद वर्णनापलिकडचा.साता समुद्रापलिकडं गेलेल्या मुलांची कृतार्थ आई आता चिमुकल्यांची आवडती बाई.नव्हे.दुसरी आई.

डॉ.सुरेश चांदवणकर, नेव्हीनगर, मुंबई

chandvankar.suresh@gmail.com.१० ऑगस्ट २०११